Website : www.jsbsatara.com
E-mail : ceo@jsbsatara.com

# जनता सहकारी बँक लि., सातारा
# JANATA SAHAKARI BANK LTD., SATARA.

Head Office : 179, Bhavani Peth, Satara - 415 002.
Phone No. 02162 - 227346, 227347, 236155, 234491 Fax : 02162 - 227344

Ref. No. 1049/2023-24

Date : - 1 JAN 2024

## जाहीर निविदा

जनता सहकारी बँकेच्या मुख्यकार्यालय व एम.आय.डी.सी शाखेतील फर्निचरला पॉलिश करणे आहे, त्या कामकाजाचा तपशील खालीलप्रमाणे.

१) बँकेची स्वमालकीची मुख्यकार्यालय, १७९ भवानी पेठ, राजपथ सातारा. या इमारतीमधील मा. संचालक मंडळ सभा हॉल, मा. चेअरमनसो, यांची केबिन व मा. मुख्य कार्यकारी अधिकारीसो यांची केबिन मधील फर्निचरला पॉलिश करणे.

२) बँकेची एम.आय.डी.सी. शाखा, देगाव फाटा, एम.आय.डी.सी. सातारा (फोन ०२१६२-२४४५२३) या इमारतीतील फर्निचरला पॉलिश करणे.

तरी इच्छुक व्यावसायिकांनी खालील नमूद केलेल्या माहिती, नियम व अटींचे अवलोकन करून आपल्या निविदा बँकेत सादर कराव्यात.

१. इच्छुक व्यावसायिकांनी बँकेच्या कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत (सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.३०) बँकेच्या मुख्यकार्यालय व एम.आय.डी.सी. शाखेस समक्ष भेट द्यावी.

२. पॉलिश करून घ्यावयाच्या फर्निचरचे तंतोतंत मोजमाप घ्यावे. व त्यांचा निविदेमध्ये उल्लेख करावा.

३. कोटेशन मंजुरी कळविल्यानंतर फर्निचरला पॉलिश करून देण्याचे कामकाज किती दिवसांत पुर्ण करणार याबाबत कालावधी नमूद करावा.

४. सदर कामकाजासाठी वापरण्यात येणा-या मटेरिअलचा उल्लेख कोटेशनमध्ये करण्यांत यावा.

५. कोटेशन सादर करताना कोटेशनमध्ये नमूद केलेले दर GST सह आहेत किंवा नाही याचा स्पष्ट उल्लेख करावा.

६. कामकाज पुर्ण झाल्यानंतर संबंधित व्यावसायीकांनी कामकाजाच्या ठिकाणची साफसफाई स्वखर्चाने करून द्यावयाची असून कामकाज करताना आजूबाजूचे इतर साहित्यावर पॉलिश पडून नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावयाची आहे.

७. सदर कामाची निविदा/कोटेशन tender नोटीसमध्ये नमूद कालावधीत बँकेच्या मुख्यकार्यालयातील प्रशासन विभागात सीलबंद पाकिटात समक्ष उपस्थित राहून हस्त पोहचीने (By Hand Only)पोहोच करावयाचे आहे.

८. कामकाज पुर्ण झाल्यानंतर मंजूर कोटेशन प्रमाणे १००% पेमेंट आदा करण्यात येईल. Advance रक्कम मिळणार नाही.

९. निविदा/कोटेशन स्वीकारण्याचा अगर नाकारण्याचा, मंजूर करणे अगर नामंजूर करण्याचा अंतिम अधिकार बँकेच्या संचालक मंडळाचा राहील.

JANATA SAHAKARI BANK LTD. HEAD OFFICE SATARA

अनिल म. जठार
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जनता सहकारी बँक लि., सातारा.